27 JUL 2026
पुढारी

# 'स्व. वसंतराव दत्तवाडे यांची पत्रकारिता' या विषयावर आज व्याख्यान

**इचलकरंजी : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सोमवार, दि. २७ रोजी सकाळी ११ वाजता दै. 'महासत्ता'चे संपादक 'स्व. वसंतराव दत्तवाडे यांची पत्रकारिता' या विषयावर विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन येथे व्याख्यान आयोजित केले आहे.

स्व. दत्तवाडे यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्यांचे पत्रकारिता क्षेत्रात मोठे योगदान आहे. पत्रकारिता क्षेत्रात त्यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती नव्या पिढीला व्हावी, या उद्देशाने व्याख्यानाचे आयोजन केले आहे. यावेळी ज्येष्ठ संपादक प्रसाद कुलकर्णी यांचे विशेष व्याख्यान होणार आहे. विद्यार्थी, पत्रकार, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

27 JUL 2026

सकाळ

# 'आविष्कार' संशोधनास चालना देणारा मंच : घाणे

कोल्हापूर, ता. २६ : 'स्पर्धेत टिकायचे असेल तर नावीन्याचा ध्यास घ्यायला हवा. अशा ध्येयवेड्या संशोधकांसाठी 'आविष्कार' स्पर्धा एक चालना देणारा मंच आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. एस. जी. घाणे यांनी केले.

शाहू कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय आविष्कार कार्यशाळेत ते बोलत होते. डॉ. आर. एच. अतिग्रे, डॉ. पी. के. पवार, डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. सुलेखा अडके उपस्थित होते. प्रभारी प्राचार्य डॉ. डी. आर. भोसले अध्यक्षस्थानी होते.

डॉ. घाणे यांनी आविष्कार ही २००७ मध्ये सुरू झालेली महत्त्वाची संशोधन स्पर्धा आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन, नावीन्यपूर्ण कल्पनांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा असल्याचे सांगितले. डॉ. पी. के. पवार, डॉ. के. व्ही. मारुलकर, डॉ. टी. डी. डोंगळे, डॉ. के. एस. वडराळे, डॉ. एस. एम. भोसले, डॉ. आर. एच. अतिग्रे, डॉ. एन. बी. गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. संयोजक डॉ. एस. डी. शेख यांनी प्रास्ताविक केले. प्रा. शामल हुंबरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. के. व्ही. गायकवाड यांनी आभार मानले.